सायबर गुन्हे रोखण्यासाठी पोलीस प्रशिक्षणार्थ्यांना विशेष मार्गदर्शन

लातूर / आविष्कार पवार :...

येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्रिक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर येथे पोलीस प्रशिक्षणार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात ३०० हून अधिक पोलीस प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सायबर वॉरिअर नरेश पंडित व सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांचे स्वरूप, त्यापासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना आणि सायबर सुरक्षेच्या आधुनिक तंत्रांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी फिशिंग लिंक, बनावट वेबसाइट, सोशल मीडिया फसवणूक, जढझ व बँकिंग फ्रॉड, डिजिटल अरेस्ट , कृत्रिम बुद्धिमत्ता चा गैरवापर, मजबूत पासवर्ड तयार करण्याची योग्य पद्धत, मोबाईलमध्ये प डाउनलोड करताना आवश्यक व अनावश्यक परवानग्या , वैयक्तिक माहितीची सुरक्षितता तसेच ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या विविध फसवणुकीच्या पद्धतींची उदाहरणांसह माहिती देत त्यापासून स्वतःचे आणि सर्वसामान्य नागरिकांचे संरक्षण कसे करावे, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच ऑनलाइन फसवणुकीचा बळी ठरल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदवावी, तसेच वेळेवर तक्रार केल्यास आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते, अशी माहितीही प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात आली. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमास पोलीस प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य पी. आर. सय्यद सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षक अधिकारी, शिक्षकवृंद व कर्मचारी यांचीही उपस्थिती होती. त्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थित पोलीस प्रशिक्षणार्थ्यांनी सायबर गुन्ह्यांविषयी अधिक सजग राहून नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावण्याचा निर्धार व्यक्त केला.